मुख्य कार्यालय,विरार
विरार (पश्चिम)
ता.वसई,पालघर- ४०१ ३०३

दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१/०२/०४/०५
फॅक्स- ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com
जावक.क्र.व.वि.श.म/फे.नि.नि.अ/ ६२/२०२६
दिनांक. २५/०६/२०२६

## पथविक्रेता निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय

पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2014 अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2016 मधील नियम 14(2) अंतर्गत पथविक्रेत्यांच्या सदस्यांची निवडणूक सन 2025-26 चे कार्यक्रमाबाबत.

### निवडणूक सुचना

ज्या अर्थी पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2014 अंतर्गत नियम 14(2) अंतर्गत 08 नगरपथ विक्रेता समितीमध्ये मा.कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडिल पत्र क्र./ काआ/ औसं/प.वि/जि.पालघर/वसई विरार म.न.पा./आदेश/04/2025/कार्या-9/ दिनांक. 1/11/2025 चे पत्रान्वये माझी पालघर जिल्ह्यातील वसई विरार शहर महानगरपालिका पथविक्रेता समितीची निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. म्हणुन मा.श्री.अजित मुठे, उपआयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी उपरोक्त पथविक्रेत्यांना कळवित आहे की, पथविक्री विनियमन अधिनियम 2014 अंतर्गत नियम 14(2) अंतर्गत आठ (08) पथविक्रेत्यांपैकी रिक्त तीन (03) सदस्यांच्या पंचवार्षिक निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेणेकरिता खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करीत आहे. सदर निवडणूक खालील दर्शविलेल्या प्रवर्गातील तीन (03) जागेकरिता घेण्यात येईल.

सन 2026 ते सन 2030

| अ.क्र. | गटाचं नाव | पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जमाती | 01 | पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्रि विनियमन) अधिनियम **2014** अंतर्गत नियम **11 (2)** अंतर्गत **08** (ख-एक) अन्वये |
| 2 | अल्पसंख्यांक | 01 | |
| 3 | विकलांग व्यक्ती (महिला राखीव) | 01 | |
| | एकूण | 03 | |

वसई-विरार शहर महानगरपालिका पथविक्रेता निवडणूक २०२६

# वसई विरार शहर महानगरपालिका पथविक्रेता समितीची निवडणूकीचा कार्यक्रम

| अ.क्र. | विवरण | दिनांक व दिवस | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| 1 | जाहिरात प्रसिद्धी करणे | 29/06/2026 | | वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय |
| 2 | नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणे | 29/06/2026 08/07/2026 | स.11:00 ते दु.02:00 पर्यंत. | वसई विरार शहर महानगरपालिका फेरीवाला निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय, पाचवा मजला,मुख्यालय,विरार (पश्चिम) |
| 3 | नामनिर्देशन प्राप्त अर्ज छाननी करणे | 10/07/2026 | दु.03.30 नंतर. | |
| 4 | नामनिर्देशन प्राप्त अर्ज छाननी अंती अंतिम वैद्य उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | 10/07/2026 | सायं.04:00 नंतर | |
| 5 | नामनिर्देशनपत्र मागे घेणे. | 13/07/2026 14/07/2026 | सकाळी.11.00 ते दुपारी 3.00 पर्यत | |
| 6 | नामनिर्देशन पत्र माघारी नंतरची अंतिम यादी प्रसिध्द करणे. | 14/07/2026 | सायं.04:00 नंतर | |
| 7 | मतदान प्रक्रिया | 22/07/2026 | स.07:30 ते सायं.05:30 | सर्व संबधीत प्रभागामध्ये होईल. |
| 8 | मत मोजणी प्रक्रिया व निकाल जाहिर करणे. | 23/07/2026 | स.10:00 पासुन | वसई विरार शहर महानगरपालिका,मुख्यालय |
| 9 | निवडणुक निकाल राजपत्रात जाहिर करणे. | 24/07/2026 | | |

(शनिवारी दिनांक. 04 जुलै, 2026 रोजी नामनिर्देशन पत्र स्विकारले जातील.)

**सुचना :-**

1) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या शहर फेरीवाला समिती निवडणूक लढविण्याकरीता उमेदवाराची पात्रता खालील प्रमाणे असेल.

- उमेदवाराचे नाव पथविक्रेत्यांच्या अंतिम मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराच्या नावे अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडील थकबाकी नसावी.
- उमेदवाराच्या नावे वसई विरार शहर महानगरपालिकेकडील मिळकत कर / पाणीपट्टी थकबाकी ना-हरकत दाखला असणे आवश्यक आहे.
- उमेदवार आरक्षित संवर्गातून निवडणूक लढवीत असल्यास त्याच्याकडे त्यासंवर्गातील जातीचा दाखला व जात पडताळणी प्रमाणपत्र, विकलांग / दिव्यांग दाखला ,अल्पसंख्याक दाखला / प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने नगरविकास विभाग यांचे पथविक्रेता असाधारण क्र. 116,3 ऑगस्ट 2016 च्या राजपत्रातील अर्जासोबत नमूद घोषणापत्र दाखल करणे आवश्यक आहे.
- उमेदवाराच्या पात्रतेबाबत इतर कोणताही मुद्दा उपस्थित झाल्यास सार्वत्रित निवडणूकमध्ये नमूद असलेले नियम लागू होतील, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ मधील मुद्दा क्र. 16 (2) मध्ये पथ विक्रेत्यास जर तो: (एक) नैतिक अध:पाताचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधासाठी सिध्द दोषी असेल किंवा(दोन) नगर पथविक्रेता समितीचा सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये पार पाडण्याकरीता शारिरिकदृष्ट्या किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम असेल, तर नगर पथ विक्रेता समितीमध्ये निवडून येण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम असेल, तर नगर पथ विक्रेता समितीमध्ये निवडून येण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

- नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाचे घोषणापत्र रुपये 500/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून जोडणे आवश्यक राहील.
- घोषणापत्रामध्ये उमेदवार ज्या प्रवर्गातून निवडणूक उमेदवारी करीत आहे त्या प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक राहील.
- दि. 12 सप्टेंबर, 2001 नंतर झालेल्या मुलामुळे एकूण अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास अथवा आधीच दोनपेक्षा अधिक असलेल्या अपत्यांच्या संख्येत दि. 12/09/2001 नंतर भर पडल्यास अशा व्यक्ति निवडणूक लढविण्यास अपात्र ठरतील.

2) नामनिर्देशन पत्र विनामुल्य पुरविण्यात येईल. अंतिम मतदार यादी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयात उपलब्ध आहे.

3) नामनिर्देशन पत्र दाखल करताना त्यासोबत उमेदवारांना अनामत रक्कम रु.2000/- जमा करावी लागेल व 1/6 मतापेक्षा कमी मत मिळाल्यास अनामत रक्कम जप्त होईल.

4) पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विक्री विनियमन) अधिनियन 2014 अंतर्गत नियम 16 (2) अंतर्गत उमेदवार अपात्र नसावा.

5) अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता नामनिर्देशन पत्र सादर करताना त्यांच्या जाती, जमातीचे सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात वैधवा प्रमाणपत्राची सत्य प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे अनिवार्य राहील.

6) नामनिर्देशन पत्र स्वत: उमेदवार किंवा त्याचे सुचक व अनुमोदक यांनी व्यक्तीश: जमा करणे बंधनकारक आहे.

7) नामनिर्देशन पत्रावर मतदार यादीमध्ये ज्याचे नाव समाविष्ट आहे अशा मतदारांपैकी एक सुचक व अनुमोदक यांचे नाव आणि त्यांची सही असणे अनिवार्य आहे.

8) उमेदवारास एका पेक्षा जास्त नामनिर्देशन पत्र दाखल करावयाचे असल्यास नामनिर्देशन पत्रावरील त्यांचे सुचक व अनुमोदक या प्रत्येक नामनिर्देशन पत्रावर वेगळे वेगळे असतील.

9) मतदानाला येताना मतदारांनी ओळखपत्र जसे मा. निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले फोटो असलेले ओळखपत्र / पॅनकार्ड / आधारकार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स किवा बॅकेने निर्गमित केलेले फोटो असलेले पासबुक सोबत आणावे लागेल अन्यथा मतदान प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

10) निवडणूक कार्यक्रमामध्ये तांत्रिक अडचणीमुळे फेरबदल करण्याचे अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे राहतील.

11) निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अनुपस्थितीत सहायक निवडणूक निर्णय अधिकारी निवडणूकीचे कामकाज पार पाडतील.

तरी पथविक्रेत्यांच्या सर्व सदस्यांनी उपरोक्त कार्यक्रमाची कृपया नोंद घ्यावी व निवडणूक कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यास सहकार्य करावे.

ठिकाण :- वसई विरार शहर महानगरपालिका

**दिनांक** :- २५ / ०६ /2026

(अजित मुठे)
निवडणूक निर्णय अधिकारी
वसई विरार शहर पथविक्रेता समिती निवडणुक
तथा उपआयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

शहर महानगरपालिका पथविक्रेता निवडणूक २०२६